# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ १० /2017-18 दिनांक :- २४/०१ /2018

प्रति,
**श्री. संतोष बसेट्टी संकेश्वरी,**
**301, फायर बिग्रेड क्वाटर्स,**
**युनिक गार्डन, कनकिया,**
**मिरारोड (पूर्व)**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**मा. स्थायी समिती सभा दि. 14/06/2017 रोजी अग्निशमन कर्मचारी यांचे संबंधीत पारित ठरावाची प्रत मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 19/01/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**
**(या कार्यालयास प्राप्त दि 24/01/2018)**

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या आवेदनावर मा. स्थायी समिती सभा दि. 14/06/2017 रोजी पारित झालेल्या ठरावाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या आवेदनावर मा. स्थायी समिती सभा दि. 14/06/2017 (दि. 08/06/2017 रोजीची तहकुब सभा) रोजी पारित झालेला ठराव क्र. 34 ची सत्यप्रत या पत्रासोबत जोडुन देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

SBSK
24/01/2018
संतोष ब. संकेश्वरी

24/01/2018

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Santosh Sankeshwari.docx

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या




## application for obtaining information under the Right of Information Act, 2005

## अर्जाचा नमुना

## Application Form

सचिव विभाग
स.प./न.प./प.प./का.क.
दिनांक : २४/०१/१८ 90 2096-34

प्रति, मा.
To, सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगर पालिका
जि. ठाणे

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : श्री. संतोष बसेट्टी संकेश्वरी
Full Name of the applicant

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : 301 फायर ब्रिगेड क्वार्टर्स युनिक गार्डन
Address कनकिया, मिरारोड (पू.)

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : महानगर पालिकेच्या दि. 8/12/2011
Particulars information required
रोजीच्या आदेशान्वये सन 2010 पासून कार्यरत अग्निशमन कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले. या संदर्भात कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या आवेदनावर मा. स्थायी समितीने ठराव पारीत केला आहे.
तरी सदर दिनांक 1?/06/2012 रोजी मा. स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावाची प्रमाणित सांक्षांकित प्रत आवश्यक आहे.
न्यायालयीन कार्यवाहीसाठी सदर कागदपत्रे आवश्यक असल्याने तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावीत, हि विनंती.

माहिती ज्याच्याशी संबंधीत असले तो कालावधी # : 2017
The period to which the information relates
माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether information is required by post or in person स्वतः स्विकारणार
(जादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल ) :

( The actual postal charges shall be included in additional fees )
जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे : —
In case by post
( साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने )
(Ordinary, Registered or Speed )

४) अर्जदार दारिद्रयरेषेखाली आहे किंवा कसे : ~~होय~~/नाही
Whether the applicant is below poverty line : ( Yes/No)
( असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी )

दिनांक 19/01/2018
Date

ठिकाण भाईंदर
Place

अर्जदाराची सही
Signature of the Applicant

*विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन देणे/सेवाविषयक बाब/लायसेन्स इत्यादी )
Broad Category of the subject be indicated (such ) as grant of Govt. Land/Service matter/Licenses etc. )
# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालावधी दर्शविण्यात यावा.
Relevant period for which information I required to be indicated
$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.
Specific details of the information is required to be indicated

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०६/२०१७ रोजीची तहकुब सभा

प्रकरण क्र. ३२
ठराव क्र. ३८

दि. १४-०६-२०१७ (के प्रस्ताव)

दि. ०२-०६-२०१७ रोजीच्या अपील अर्जाचा निर्णय

मिरा भाईदर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागात मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. २०/२००९ दि. ०२/०७/२००९ अन्वये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार महापालिका आस्थापनेवर मंजुर अग्निशमन विभागाची पदे तातडीने तीन महिन्यात भरण्याच्या आदेशानुसार महापालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम १९४९ कलम ५३ अन्वये तत्कालीन प्रचलीत महापालिकेत सेवा भरती नियमानुसार खालीलप्रमाणे दै. नवाकाळ, दै. मुंबई सकाळ, दै. मुंबई लक्षव्दिप, दै. नवशक्ती मध्ये दि. २६/०८/२००९ व दि. १३/०८/२०१० रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केली. तसेच रोजगार व स्वयंरोजगार ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर यांचेकडून उमेदवारांच्या नावाची यादी मागविण्यात आली. जाहिरातीत पुढीलप्रमाणे पद, शैक्षणिक पात्रता व अर्हता महापालिकेने मागविली होती.

| पद | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| फायरमन | किमान एस. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई/ राज्यशासन मान्यता प्राप्त व समकक्ष अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण असणाऱ्यांना व अवजड वाहन चालविण्याचा परवाना असणा-यांना प्राधान्य |
| लिडिंग फायरमन | किमान एस. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई/ राज्यशासन मान्यता प्राप्त व समकक्ष अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ड्रायव्हर ऑपरेटर | किमान एस. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई/ राज्यशासन मान्यता प्राप्त व समकक्ष अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. जड वाहन चालविण्याचा वैध परवाना. |

वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता जाहिरातीत देण्यात आली होती. त्या जाहिरातीनुसार मुदतीत प्राप्त अर्जाची महानगरपालिकेने छाननी केली. छाननीत अर्ज ग्राहय धरून लेखी, शारिरीक चाचणी परिक्षा, व तोंडी मुलाखत घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात आली. निवडी नंतर मा. महासभा दि. ३०/०५/२०११ ठराव क्र. २८ अन्वये नियुक्तीस मान्यता देऊन नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना आवश्यकता असल्यास राज्य अग्निशमन प्रशिक्षणास पाठविण्यात यावे अशी सभेने मंजुरी दिली. परंतु तद्नंतर अग्निशमन पाठंयक्रमास MSBTE ची मान्यता नाही म्हणुन सेवेतून दि. ०८/१२/२०११ रोजी बडतर्फीचे आदेश पारित केले. त्या आदेशाविरुध्द बडतर्फ कर्मचा-यांनी मा. न्यायालयात दावा दाखल केला सद्यस्थितीत प्रकरण मा. न्यायालयात प्रलंबित आहे.

सत्य प्रत

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिकेने प्रसिद्धी केलेल्या जाहिरातीच्या अनुशंगाने सर्व निवड झालेल्या कर्मचा-यांनी शैक्षणिक पात्रता व तांत्रिक अर्हतेची कागदपत्रे सादर केली होती .महानगरपालिकेने भरतीच्या प्रसिद्धी केलेल्या जाहिरातीत किंवा त्यावेळी प्रचलित असलेले महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमात प्रशिक्षणास MSBTE ची मान्यता व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण आवश्यक अशी कोणतीही अट नसताना महापालिकेने अग्निशमन कर्मचा-यांनी सादर केलेली तांत्रीक अर्हतेची प्रमाणपत्रे मा.संचालक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेजवळ पाठवुन प्रमाणपत्रांना MSBTE ची मान्यता आहे काय ? अशी विचारणा केली.वास्तविक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई या संस्थेच्या वतीने अग्निशमन विषयक प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जात नाहीत असे दि.२२/०९/२०११ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे .महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे एक वर्ष किंवा अधिक कालवधीचे अग्निशमन विषयक शासनमान्य पदविका अभ्यासक्रम घेण्यात येत असल्याने त्याला MSBTE ची मान्यता लागते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळा मार्फत अग्निशमन प्रमाणपत्र पाठय्क्रम घेतले जात नाहीत.त्यामुळे अग्निशमन पाठ्यक्रमास MSBTE ची संलग्नतेची आवश्यकता नाही त्यामुळे महापालिकेने सतरा जणांना बडतर्फ करण्याचा घेतलेला निर्णय हा सकृत दर्शनी चुकिचा वाटत असुन त्यांना त्याची न्याय बाजु मांडण्यास पुरेसा वेळ न देता घाईत घेतलेला निर्णय आहे. कर्मचा-यांवर अन्याय झालेला असून सदर कर्मचारी अग्निशमन विभागात उत्तम प्रकारे आपले कर्तव्य व त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदा-या पार पाडत आलेले आहेत. यामुळे मा. स्थायी समिती सभा दि. १०-२-२०१७ ठराव क्र. १०८ अन्वये सदर कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठा व कामाच्या जबाबदारीची दखल घेवून सेवेत कायम ठेवणेबाबत ठराव पारित केलेला आहे. आज रोजी बडतर्फ बहुतांश कर्मचा-यांनी सरळ सेवा भरतीची वयोमर्यादा ओलांडली असून भविष्यात त्यांना अन्य ठिकाणी नोकरी मिळणे दुरापास्त आहे तसेच यापैकी सर्व कर्मचा-यांचे विवाह झाले असून त्यांना मुले आहेत त्यांची मुले शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या कर्मचा-यांना जर सेवेतून बडतर्फ केले तर त्यांचेवर अवलंबून संपूर्ण कुंटुंब उघडयावर येणार आहे. या सर्व बाबींचा विचारकरता प्रशासनाने केलेली बडतर्फीची कार्यवाही ही फारच कठोर असुन कर्मचारी व त्यांचेवर अवलंबुन कुटुंब उध्वस्त करणारे असल्याने संबंधितांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(४) अंतर्गत तरतुदी अन्वये स्थायी समिती सभेकडे केलेल्या अपिल अर्जानुसार सभेस प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून सभा प्राप्त अधिकारांनुसार कर्मचा-यांचे अपिल मान्य करित असून दि. ०८/१२/२०११ रोजीचे बडतर्फीचे व दि. ०५/०६/२०१७ रोजीचे सेवा समाप्तीचे आदेश रद्द करीत असुन सदर कर्मचाऱ्यांनी एक वर्षाच्या मुदतीत महानगरपालिके तर्फे शासन मान्यता प्राप्त असलेल्या संस्थेकडून त्यांचे पदास आवश्यक ती अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण करुन घेण्यात यावी. तसेच त्यांना नियमित महानगरपालिका सेवेत ठेऊन घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक
श्रीम. शर्मिला बगाजी

अनुमोदक
श्री. यशवंत कांगणे

निर्णय सर्वानुमते मंजुर

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा- भाईंदर महानगरपालिका